| MHKO170004812011 | नियमित दिवाणी दावा क्र. ९४/२०११<br>काशीनाथ यशवंत जाधव<br>वि.<br>बाजीराव गोविंद जाधव वगैरे |
|---|---|

## नि. १४० वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १ यांचे वारसांनी कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी यांचे पूर्व हक्कदार आनंदा गोविंद जाधव यांचे मृत्यूपश्चात गावचे रेकॉर्डला वारसा ठराव क्र. ९ मंजूर होवून एकत्र कुटुंब पुरुष म्हणून यशवंत गोविंद जाधव यांचे नाव नोंद करणेबाबत झालेल्या सदर ठरावाची सही शिक्कयाची नक्कल या अर्जासोबत हजर केलेली आहे. सदर नक्कल म्हणजे सरकारी दप्तरी केलेल्या नोंदीची सही शिक्कयाची नक्कल आहे. शिवाय या ठरावाद्वारे मंजूर केलेल्या फेरफारची नक्कल या पूर्वीच रेकॉर्डवर हजर करण्यात आलेली आहे व त्यास निशाणही देण्यात आलेले आहे. या दाव्याचा गुणदोषावर परिणामकरित्या व अंतिम निवाडा करण्यासाठी हजर केलेल्या कागदपत्रांची जरुरी आहे. त्यामुळे सदरचे कागदपत्र दाखल करून घेणे गरजेचे आहे. अंतिमतः प्रतिवादी क्र. १ तर्फे वकिल यांनी सदर अर्ज मंजुर करणेत यावा अशी विनंती केली.

४. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तिवाद केला की, सदर अर्जामध्ये कोणतेही संयुक्तिक कारण नमूद नाही. तसेच प्रतिवादी यांनी या आधी सदरची कागदपत्रे हजर केलेली नाहीत. तसेच सदर कागदपत्रांबाबत प्रतिवादी यांनी कैफियतीमध्ये उल्लेख केलेला नाही. सदरचे काम अंतिम युक्तीवादासाठी प्रलंबित असताना प्रतिवादी यांनी सदरची कागदपत्रे

हजर केलेली आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होणे गरजेचे आहे. वादी तर्फे वकील यांनी **विनायक वि. उल्हास २०१८(२) एम. एच. एल जे ३४८** या न्यायनिर्णयावर त्यांची भिस्त ठेवली आहे. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

५. वादी यांचा अर्ज, प्रतिवादी यांचे म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वादी यांनी सदरचा दावा हा वाटपाकरिता दाखल केल्याचे दिसून येत आहे. सदर दावा हा आत्ता अंतिम युक्तिवादाकरिता प्रलंबित आहे. सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. १ यांनी दि. १६.१०.२०२३ रोजी त्यांचा पुरावा संपल्याची पुरसीस नि. १२८ येथे दाखल केलेली आहे.

७. तसेच वादी यांनी दाखल केलेल्या **विनायक वि. उल्हास २०१८(२) एम. एच. एल जे ३४८** या न्यायनिर्णयामध्ये दिवाणी न्यायाधीश पणजी यांनी दि. २८.०९.२०१६ रोजी पारीत केलेल्या आदेशाविरुद्ध सदरची याचिका दाखल करण्यात आलेली होती. सदर याचिकेमध्ये दिवाणी न्यायाधीश पणजी यांनी प्रतिवादी यांचा वादी यांचे उलटतपास घेतेवेळी दाखल केलेला कागदपत्रांचा अर्ज त्यांनी मंजूर केलेला होता त्या आदेशाविरुद्ध दाखल करण्यात आलेली होती.
सदर न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती ही वेगळी आहे.

८. सदर प्रकरण हे अंतिम युक्तीवादासाठी प्रलंबित आहे. तसेच सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचा पुरावा संपलेला असताना देखील सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदरबाबत झालेला विलंब हा दुर्लक्ष करता येणारा नाही. तसेच अद्याप दोन्ही बाजूंनी त्यांचा युक्तिवाद सादर केलेला नाही. त्यामुळे सदरबाबत अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

**प्रतिवादी क्र. १ यांचा नि. १४० वरील अर्ज रक्कम रु. ५००/– वादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात आला आहे.**

**सही/–**

पन्हाळा
दि. १०.०३.२०२६

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.